॥ श्री ॥
॥ बाबा ॥

आकाशाशी जडले नाते शिवशंकराचे,
आगमन ढुंढीराजाचे,आगमन ढुंढीराजाचे ॥धृ॥

शिवाची ती अगाध लिला,निर्मिला लावण्य पुतळा,
शिवाच्या पहावया नंदना,रुंजी घालीती स्वर्गांगना,
करिती कौतुक हो त्याचे ॥1॥ आगमन ढुंढीराजाचे.....

पाहुनिया तो लावण्यगाभा,देवांगना दर्शना उभ्या,
पार्वती कोपे तया वेळा,मत्सरे शापी शिवबाळा,
अंगी मिरविशील सर्प हो साचे ॥2॥ आगमन ढुंढीराजाचे

ऐकुनी उमेची शापवाणीस,क्रुध्द होई शुलपाणी
सर्वांगाचे करुनी मर्दन,शिवे निर्मिले अनेक नंदन,
शिवसुते आक्रमिले,राज्य स्वर्गिचे ॥3॥ आगमन ढुंढीराजाचे...

शिवसुते व्यापिले तिन्ही लोक,देवादिकांसी वाटे धाक,
अवस्था त्यांची हो अतिकरुण,जाता ते ब्रह्मासी शरण,
तया ब्रह्मे कथिले कारण शिवलिलेचे ॥4॥ आगमन ढुंढीराजाचे

ब्रह्मा म्हणे तव देवांसी,हे संकट नव्हे तुम्हासी
देव कार्य राखण्यासी,निर्मिले तव रक्षणासी,
असति सुत हे शिवशंकराचे ॥5॥ आगमन ढुंढीराजाचे.....

शिवशंकराचे हे सुत ,करतील देवांचे ते हीत,
शिवाने जो प्रथम निर्मिला,पार्वतिने हो शापिले त्याला,
करीले अधिपत्य हो तयांचे ॥6॥ आगमन ढुंढीराजाचे.....

असा जो शिवसुत पहीला,जो आकाशे निर्मिला,

दुंढीराज नाम गणेशाचे ॥7॥ आगमन दुंढीराजाचे.....

★★★★★